Yuvraaj Hygiene Products Limited

04th December, 2020

To,

The Manager – CRD
BSE Limited
PhirozeJeejeebhoy Tower,
Dalal Street, Fort, Mumbai – 400 001
Scrip Code: 531663

Sub: Submission of copies of Newspaper Advertisement for Information regarding the 25th Annual General Meeting of the Company to be held through Video Conference or Other Audio Visual means.

Dear Sir/Mam,

With reference to the above captioned subject and pursuant to Regulation 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, we wish to inform you that the Company has published the newspaper advertisement informing the members about the 25th Annual General Meeting of the members of the Company scheduled to be held on Tuesday, 29th December, 2020 through Video Conferencing or Other Audio Visual Means, in compliance with the General Circulars issued by Ministry of Corporate Affairs dated April 8, 2020, April 13, 2020 and May 5, 2020 and the Circular issued by the SEBI dated May 12, 2020 in the following two newspapers:-

1. Business Standard (English Newspaper).
2. The Global Times (Marathi Newspaper).

Copy of newspaper advertisement is enclosed herewith for your records.

Thanking you,

Yours faithfully,

For **Yuvraaj Hygiene Products Limited**

Ravindra Sharma
Chief Financial Officer

YUVRAAJ HYGIENE PRODUCTS LIMITED ★ NAVI MUMBAI

(Encl.: As above)

IT sector likely to get a booster shot as firms plan to spend more

SAMREEN AHMAD
Bengaluru, 3 December

Having been able to brave pandemic-triggered business challenges to a large extent, Indian IT and IT-enabled services (ITeS) sector is staring at a favourable business environment.

According to a report by industry body Nasscom, IT spending is expected to get a further boost as a majority of the clients would reprioritise spending to strengthen digital capabilities and cloud migration apart from increasing the overall IT budget.

According to the report, titled Future of Technology Services – Navigating the New Normal, 87 per cent of the client chief investment officers (CIOs) said business digitisation and digital channels would be their focus areas in the next 12-18 months. According to the report, 47 per cent are expecting to embark on cloud transformation to stay afloat in the new business environment.

With accelerated digital adoption, about 80 per cent of the near-term spending may be driven by Covid-19-resilient digital offerings. This is also expected to result in a consolidation of the vendors. Sixty per cent of the clients are looking for vendor consolidation, the report said, while another 23 per cent were planning to selectively add specialist partners (service providers).

"The report suggests that the world has leapfrogged on digital adoption by three to five years in the past nine months. Agile companies have made the most by rewiring their operating models," said Noshir Kaka, Senior Partner and Global Leader, Analytics, McKinsey & Company, which did third-party research and analysis on the report.

Nasscom President Debjani Ghosh said the next 10 years would be fundamentally different. "To ensure faster recovery, companies need to develop a two-part response to the evolving landscape: near-term plan of action and long-term strategic rethinking."

One of the major shifts that the industry is expecting in coming days will be in areas of "future of work" as well as the delivery model, which will not be dependent on any location or geography but can be executed from 'any shore'.

While there is a high share of remote working currently, the future of work will be a hybrid model. "It may not be the same set of people always working from home or always working from the office. There will be a lot of flexibility," said Nasscom Chairman U B Pravin Rao, who is also the chief operating officer of Infosys.



Will exercise first refusal on Hines stake in Gurugram property: DLF

Blackstone, Brookfield, Allianz make ₹2,000-crore bid for the property

RAGHAVENDRA KAMATH
Mumbai, 3 December

Even as global investors – including US-based fund manager Blackstone, Canada-based Brookfield Asset Management, German investor Allianz — have bid for the One Horizon Center (OHC), DLF, which owns the property along with US-based investor Hines, has said it will exercise the right of first refusal (ROFR) on its partner's stake.

Fairleaf Real Estate, the entity that owns OHC is a 50-50 joint venture between Hines and DLF group. The 814,169 square feet 25-storey property in Golf Course Extension in Gurugram is valued at around ₹2,000 crore, said sources.

A Hines spokesperson said it is looking to exit and is in discussions with several investors. When asked about bids put in by various investors, the person said, "We are running a market process".

Though sources said DLF is not exercising its right of first refusal (ROFR) on the sale of Hines' stake, when contacted, Ashok Tyagi, whole-time director at DLF said: "We would like to reiterate that One Horizon Center is a key asset in our portfolio and while all parties can explore third-party options, we are very sure that DLF group will exercise its ROFR and/or other contractual options as per the JV agreement to buy off Hines stake in the JV at an appropriate time in an appropriate manner."

While Blackstone and Brookfield plan to put it in their upcoming REITs (real estate investment trust) if they buy it, Allianz is bidding with its partner NPS under their $2.3 billion core assets fund, said sources.

In June, Allianz Real Estate raised its first-ever third-party real estate fund, securing capital from South Korea's National Pension Service (NPS) to invest in core assets across Asia-Pacific. Last year, the Shapoorji-Allianz combine bought Waverock property in Hyderabad from GIC and investor Tishman Speyer for ₹1,800 crore.

When contacted, Brookfield, Allianz, and Blackstone did not offer any comments.

Blackstone is the largest owner of offices, with a total area of 118 million sq ft and invested over $7 billion in properties. It has floated two REITs with its partners Embassy Developments and K Raheja Corp.

IN DETAILS

- Fairleaf Real Estate, owner of the property, is a 50-50 joint venture between Hines and DLF group
- The 814,169 sq ft 25-storey property in Golf Course Extension in Gurugram
- Blackstone and Brookfield plan to put it in their upcoming REITs
- Allianz is bidding with its partner NPS under their $2.3 billion core assets fund

YES Bank takes on lease 62,500 sq ft office space from Max group

Max group's realty arm Max Estates on Thursday said it leased 62,500 sq ft of office space to YES Bank in its commercial project in Noida, Uttar Pradesh.

Max Estates is a subsidiary of Max Ventures & Industries. In a statement, the company said it leased about 62,500 sq ft at its commercial project 'Max Towers' in Noida to YES Bank, which plans to relocate its offices from the Central Business District to rationalise cost. During the last six months, Max Estates has leased around 25,000 sq ft to Indian Energy Exchange. PTI

UltraTech to invest ₹5,477 cr to add 12.8 mt capacity

ADITI DIVEKAR
Mumbai, 3 December

The UltraTech Cement board on Thursday approved an investment of ₹5,477 crore to increase the capacity by 12.8 million tonne (mt), which would be a combination of brown and green field expansions. This investment would be over and above the planned ₹1,500-crore capex for FY21, the company said, citing the economic recovery in the domestic market and the uptick demand for cement.

The Aditya Birla Group company in a release said the additional capacity would be created in the fast-growing markets of the east, central, and north regions of the country.

Demand in the east has been the strongest of all regions, supported by government spending as well as increased labour availability, as migrant workers returned to hometowns due to the Covid-19 pandemic, said a recent MotilalOswal report.

"This significant investment in a core infrastructure sector will accelerate the wheels of economic activity and aid to the kick-start of private investment cycle. The capital outlay, given the current economic backdrop, is aligned with the government's Atmanirbhar Bharat programme. It is also a marker of UltraTech's ascent from being India's No.1 cement player to a national champion," the release quoted Kumar Mangalam Birla, chairman of Aditya Birla Group, as saying.

"THIS INVESTMENT IN A CORE INFRASTRUCTURE SECTOR WILL ACCELERATE THE WHEELS OF ECONOMIC ACTIVITY AND AID TO THE KICK-START OF PRIVATE INVESTMENT CYCLE"

KUMAR MANGALAM BIRLA
chairman, Aditya Birla Group

The new capacities are expected to go on stream in a phased manner by Q4FY23, said the release. "The cement industry has been witnessing healthy volumes after relaxation of lockdown, on the back of the government's thrust on infrastructure, underlying demand from the rural economy and individual home builders. Given its pan-Indian presence, which will be further strengthened by the capacity expansion, UltraTech will be well positioned to support the rising demand for cement in the country," Birla said.

This expansion includes the existing approval for the cement plant at Pali in Rajasthan, in addition to the company's 6.7 mt capacity expansion underway in Uttar Pradesh, Odisha, Bihar, and West Bengal, which is expected to get commissioned by FY22 in a phased manner.

'बेस्ट'मधील ५२ कर्मचाऱ्यांचा आजवर मृत्यू
करोनामुक्तीचा दर ९५ टक्के; काही कर्मचारी विलगीकरणात

मुंबई: बेस्ट उपक्रमामध्ये करोनामुक्त होण्याचे प्रमाण ९५ टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. एकूण २ हजार ८३५ पैकी २ हजार ६९० बाधित करोनामुक्त झाले असून यातील ५२ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले. उर्वरित रुग्णांवर रुग्णालयात उपचार सुरु असून काही कर्मचारी विलगीकरणात आहेत.

अत्यावश्यक सेवेसाठी करोनाकाळात बेस्टच्या परिवहन सेवेबरोबरच वीज विभागातील कर्मचारी कार्यरत होते. त्यामुळे परिवहन सेवेतील जवळपास ६० ते ७० टक्के चालक व वाहकांना कर्तव्यावर असताना करोनाची लागण झाली आहे. त्यानंतर परिवहन सेवा, बेस्टमधील अभियंता विभाग, सुरक्षारक्षक आणि अन्य विभागातील कर्मचारी आहेत. सध्याच्या घडीला बेस्टमधील ५० पैकी ४० कर्मचाऱ्यांना सौम्य व अतिसौम्य लक्षणे आहेत, तर यातील उर्वरित दहा जण हे ऑक्सिजनवर आहेत. याशिवाय ४८ कर्मचारी संशयित असल्याने त्यांना विलगीकरणात ठेवले आहे.

आतापर्यंत ५२ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला आहे. ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत हीच संख्या ३७ होती. ही संख्या जास्त असल्याचा दावा बेस्टमधील संघटनांनी केला आहे, परंतु बेस्ट उपक्रमाकडून अद्याप ५२ मृत्यू झाल्याचे स्पष्ट केले आहे. उपक्रमात करोना झालेल्या कर्मचाऱ्यांनी एक ते तीन महिनेही उपचार घेऊन त्यावर मात केल्याचीही नोंद आहे.

महाविद्यालय, विद्यार्थ्यांपुढे शुल्कपेच
प्रवेश प्रक्रिया लांबल्याने आर्थिक फटका

मुंबई : व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या लांबलेल्या प्रवेश प्रक्रियेमुळे एका बाजूला लाखो विद्यार्थ्यांवर आलेला दोन अभ्यासक्र मांच्या शुल्कांचा भुर्दंड तर दुसऱ्या बाजूला प्रवेश रद्द करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या रिक्त जागांमुळे महाविद्यालयांची कोंडी, असे चित्र उच्चशिक्षण क्षेत्रात दिसत आहे.

राज्यातील पारंपरिक आणि स्वयंअर्थसहाय्यित अभ्यासक्रमांचे अध्यापन सुरू होऊन पहिले सत्र आता संपत आले आहे. बहुतेक सर्व विद्यापीठांनी पहिल्या सत्राच्या परीक्षांचेही नियोजन केले आहे. मात्र, आता अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, कृषी, विधि, शिक्षणशास्त्र, ललित कला, वास्तूकला, हॉटेल मॅनेजमेंट, व्यवस्थापन पदव्युत्तर यांसह विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू होणार आहे. करोनाच्या प्रादुर्भावामुळे यंदा या अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा रखडल्या. परीक्षा झाल्यानंतरही मराठा आरक्षणाबाबतच्या पेचामुळे ही प्रवेश प्रक्रिया यंदा लांबली. या अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियांबाबत अनिश्चितता असल्यामुळे बहुतेक विद्यार्थ्यांनी पारंपरिक अभ्यासक्रमांना प्रवेश निश्चित केले. आता व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्यानंतर आधीचे प्रवेश रद्द करून विद्यार्थ्यांना नव्याने प्रवेश घ्यावे लागणार आहेत. एक सत्र जवळपास संपल्यानंतर दुसऱ्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेताना आधीच्या अभ्यासक्रमाचे संपूर्ण वर्षांचे शुल्क परत मिळणार का याबाबत संभ्रम आहे. त्याचवेळी विद्यार्थ्यांनी प्रवेश रद्द केल्यास आता नव्याने प्रवेश कसे होणार, असा प्रश्न महाविद्यालयांनाही सतावत आहे.

विद्यार्थ्यांना भुर्दंड

पारंपरिक अभ्यासक्रमाचे अनुदानित महाविद्यालयांचे शुल्क तुलनेने कमी आहे. मात्र, अनेक विद्यार्थ्यांनी स्वयंअर्थसहाय्यित अभ्यासक्रमांना प्रवेश घेतले आहेत. यातील काही अभ्यासक्रमांचे शुल्क हे लाखो रुपयांच्या घरात आहे. त्याचप्रमाणे व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शुल्कही २५ हजार रुपयांपासून सुरू होते. आधीचे शुल्क परत न मिळाल्यास दोन्ही अभ्यासक्रमांचे शुल्क भरावे लागणार आहे. 'आम्ही सध्या ऑनलाइन शिकत आहोत. महाविद्यालयांनी शुल्क घेतलेल्या अनेक सुविधा या सत्रात वापरलेल्या नाहीत. नव्या महाविद्यालयात प्रवेश घेताना तेथेही अनेक सुविधा लगेच वापरात येणार नाहीत. मात्र, दोन अभ्यासक्रमांचे शुल्क भरावे लागणार आहे,' असे औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या एका विद्यार्थ्याने सांगितले.

महाविद्यालयांची कोंडी

महाविद्यालये सत्र किंवा वर्षांचे शुल्क घेतात. दरवर्षी साधारणपणे महाविद्यालय सुरू झाल्यानंतर एक ते तीन महिन्यात विद्यार्थ्यांने प्रवेश रद्द केल्यास त्याला काही प्रमाणात शुल्क देण्यात येते. यंदा संपूर्ण सत्र महाविद्यालयाने अध्यापन केले आहे. आता विद्यार्थ्यांनी प्रवेश रद्द केल्यास त्यांच्या जागी दुसरे विद्यार्थी मिळण्याची शक्यता कमी आहे. असे असताना विद्यार्थ्याला त्याचे सर्व शुल्क देणे शक्य नाही. महाविद्यालयांना रिक्त जागांवर प्रवेश करण्याची मुभा मिळाली तरीही नामवंत महाविद्यालयातील प्रवेश होतील. म्हणजेच सध्या मधल्या फळीतील महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतलेले विद्यार्थी काही प्रमाणात महाविद्यालय बदलतील. मात्र, त्यामुळे मधल्या फळीतील महाविद्यालयांना फटका बसेल, असे एका महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी सांगितले. 'विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळापत्रक जाहीर केले तेव्हा नोव्हेंबरमध्ये महाविद्यालये सुरू होणे अपेक्षित होते.

शस्त्रक्रिया करण्याची आयुर्वेद डॉक्टरांना दिलेली परवानगी रद्द करण्याची मागणी
इंडियन मेडिकल असोसिएशने आंदोलनाच्या पावित्र्यात

मुंबई : आयुर्वेद डॉक्टरांना शस्त्रक्रिया करण्यास दिलेल्या संमती विरोधात इंडियन मेडिकल असोसिएशने (आयएमएने) आंदोलन करण्याचा पवित्रा घेतला असून ही अधिसूचना मागे न घेतल्यास ११ डिसेंबरला राज्यासह भारतभरात वैद्यकीय सेवा बंद करण्याचा इशारा दिला आहे.

केंद्रीय भारतीय वैद्यक परिषदेने (सीसीआयएम) मूत्ररोग, पोट आणि आतड्याच्या, दंतरोग, नेत्ररोगासह ५८ प्रकारच्या शस्त्रक्रिया आयुर्वेदातील 'शल्यतंत्र' आणि 'शालाक्यतंत्र' पदव्युत्तरांना स्वतंत्रपणे करण्याची परवानगी दिली आहे.

या शस्त्रक्रिया आधुनिक वैद्यकातील (ॲलोपॅथिक) नसून आयुर्वेदिक आहेत असा दावा सीसीआयएमने केला आहे. संस्कृतोत्पन्न नावेदेखील दिलेली आहेत, असा आक्षेप आयएमएने घेतला आहे. ॲलोपॅथीमध्ये एमबीबीएसच्या अभ्यासात साडेचार वर्षे शरीर रचनाशास्त्र, शरीरक्रिया शास्त्र, शरीरातील अनेकविध रासायनिक द्रव्यांचा आणि त्यांच्या क्रिया-प्रक्रियांचा अभ्यास करणारे शास्त्र, शरीरातील अवयवांना आजार झाल्यावर त्यामध्ये निर्माण होणाऱ्या विविध विकृती आणि बदल अभ्यासणारे शास्त्र अशा विषयांचा सखोल अभ्यास करतात. त्यानंतर पदव्युत्तर अभ्यासात तज्ज्ञ सर्जनच्या मार्गदर्शनाखाली शस्त्रक्रिया करण्याच्या अनेक पद्धती, त्यातील कौशल्ये यांचा परिपूर्ण व सूक्ष्म अभ्यास आणि प्रात्यक्षिक अनुभव तीन वर्षे घेतात.

त्यानंतर त्यांना 'एम.एस.' ही पदवी मिळते, तर आयुर्वेदाच्या पदवीपूर्व अभ्यासात केवळ आयुर्वेदाचेच मूलभूत विषय शिकवले जातात. त्यामुळे आयुर्वेदिक विद्यार्थ्यांना आधुनिक वैद्यकाचे शिक्षण देणे अतार्किक ठरेल असे मत आयएमएने मांडले आहे.

ही अधिसूचना मागे घेण्याच्या मागणीसाठी राज्यभरात ८ डिसेंबरपासून मेडिकल स्टुडन्टस नेटवर्क, मार्ड यासह आयएमए शांततामय निदर्शने करणार आहे. अधिसूचना मागे न घेतल्यास ११ डिसेंबरला सकाळी ६ ते संध्याकाळी सहा या वेळेत अत्यावश्यक आणि करोना सेवा वगळता भारतभरात अन्य वैद्यकीय सेवा बंद ठेवण्यात येतील असे आयएमएने जाहीर केले आहे.

महापरिनिर्वाणदिनी चैत्यभूमीवर गर्दी टाळा
बाबासाहेबांना ऑनलाइन करा अभिवादन
बीएमसीचं आवाहन
कोरोनाचा प्रसार टाळण्यासाठी गर्दी न करण्याचे आवाहन

मुंबई :करोनाचा प्रसार टाळण्यासाठी यंदा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६४ व्या महापरिनिर्वाणदिनी (६ डिसेंबर) नागरिकांनी चैत्यभूमीवर गर्दी करु नये. तर आहे तिथूनच किंवा ऑनलाइन स्वरुपात बाबासाहेबांना अभिवादन करावे, असे आवाहन मुंबई महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे. यासाठी चैत्यभूमीवरील कार्यक्रमाचे युट्युबवरुन थेट प्रक्षेपणही करण्यात येणार आहे.

करोनाच्या काळात बंद असलेली विविध धार्मिक स्थळं आता खुली करण्यात आली आहेत. मात्र, अद्यापही करोनाचा धोका कायम असल्याने या धार्मिक स्थळांवर गर्दी टाळण्याचे आवाहन सरकारकडून वारंवार करण्यात येत आहे. घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनी त्यांना अभिवादन करण्यासाठी त्यांचे

स्मृतीस्थळ असलेल्या दादर येथील चैत्यभूमीवर लाखोंचा जनसागर उसळलेला असतो. मात्र, यंदा करोनाचं संकट असल्याने चैत्यभूमीवर गर्दी होऊ नये त्यातून संसर्ग वाढू नये यासाठी महापालिकेकडून खबरदारी घेतली जात आहे. यासाठी चैत्यभूमीवरुन बाबासाहेबांना ऑनलाइन स्वरुपात अभिवादन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

यंदा करोनाच्या पार्श्वभूमीवर, बृहन्मुंबई महापालिकेकडून महापरिनिर्वाण दिनी पुरवण्यात येणाऱ्या नागरी सेवा-सुविधा अंशतः रद्द करण्यात आल्या आहेत. त्यामुळेच 'गर्दी नको, नको संसर्ग – कोविडपासून करु आपलं नी आपल्यांचं रक्षण' या टॅगलाईनद्वारे महापालिकेने नागरिकांना गर्दी न करण्याचं आवाहन केलं आहे. "चैत्यभूमीवर केवळ अभिवादनाचा शासकीय कार्यक्रम पार पडेल, त्यामुळे महापरिनिर्वाणदिनी तुम्ही जिथे असाल तिथूनच बाबासाहेबांना अभिवादन करा," असं आवाहन महापौर किशोरी पेडणेकर यांनी केलं आहे.

बाबासाहेबांना अभिवादनाचा कार्यक्रम युट्युबवरुन ऑनलाइन प्रसारित केला जाणार आहे. त्यासाठी http://bit.ly/abhivadan2020yt या लिंकवर जाऊन नागरिकांना आणि भिमानुयांना ऑनलाइन अभिवादन करता येणार आहे.

कंगना रानौतवर भडकला ऑलिम्पिक पदक विजेता बॉक्सर
शिवसेनेवरील प्रश्नावरही दिलं रोखठोक उत्तर!

मुंबई : वादग्रस्त वक्तव्यामुळे चर्चेत राहणा-या कंगना राणौतने दिल्लीत सुरु असलेल्या शेतकरी आंदोलनावर प्रतिक्रिया दिली आणि ती तोंडघशी पडली. या आंदोलनात सहभागी झालेल्या पंजाबच्या एका वयोवृद्ध महिलेची खिल्ली उडवणारे ट्वीट तिने केले आणि काही वेळात तिने हे ट्वीट डिलीटही केले. पण तोपर्यंत या ट्वीटचे स्क्रिनशॉट्स व्हायरल झाले होते. यावरून कंगना जबरदस्त ट्रोल झाली.आता सिंगर व अभिनेता दिलजीत दोसांजने कंगनाच्या या ट्वीटवर सणसणीत प्रतिक्रिया दिली. पण, यानंतर कंगनानं दिलजीत दोसांज याला करण जोहर के पालतू असे म्हटले आणि त्यानंतर ऑलिम्पिक पदक विजेत्या बॉक्सर विजेंदर सिंग यानेही उडी मारली. दिलजीतने संबंधित शेतकरी महिलेचा व्हिडीओ पोस्ट करत कंगनाला चांगलेच सुनावले. 'कंगना, पुराव्यासोबत हे ऐक. बंदा इतना भी अंधा नहीं होना चाहिए,'असे या पोस्टसोबत दिलजीतने लिहिले.

उपनगरी गाड्यांमधील गर्दी रोखण्यासाठी वेळा बदला
प्रवासी संघटनेचा सामान्य प्रशासन विभागाकडे पत्रव्यवहार

मुंबई: लोकलमधील गर्दीचे नियोजन करण्याकरिता शासकीय व खासगी कार्यालयांच्या वेळांमध्ये बदल करा, ही मागणी प्रवासी संघटनांकडून नुकतीच सामान्य प्रशासन विभागाकडे करण्यात आली. त्यानंतर या विभागाने आपत्ती व्यवस्थापक विभागाला पत्र पाठवून प्रवासी संघटनांच्या निवेदनावर कार्यवाही करावी, अशी विनंती केली आहे.मध्य आणि पश्चिम रेल्वेवर सध्याच्या घडीला अत्यावश्यक सेवा कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त सर्वच महिलांनाही लोकल प्रवासाची परवानगीही देण्यात आली आहे. करोनाकाळात हा प्रवास सुरक्षितपणे व्हावा, यासाठी शासकीय व खासगी कार्यालयीन वेळांमध्ये बदल करा, अशी मागणी प्रवासी संघटना करत आहेत. गेल्या पाच वर्षांपासून सातत्याने मागणी करूनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. किमान करोनाकाळात आणि त्यानंतही कार्यालयीन वेळांत बदल केल्यास प्रवास सुकर होईल, अशी आशा प्रवासी संघटनांकडून व्यक्त करण्यात आली आहे.

त्यासंदर्भातच प्रथम सामान्य प्रशासन विभागाकडे उपनगरीय रेल्वे प्रवासी एकता संस्थेने नोव्हेंबरच्या अखेरीस निवेदन दिले आहे. याशिवाय शासकीय कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या १०० टक्के अनिवार्य उपस्थितीचा फेरविचार करावा, उपनगरीय रेल्वेतून खासगी कार्यालयातील कर्मचाऱ्यांना प्रवास करण्यास परवानगी द्यावी, कसारा-कल्याण व कर्जत-कल्याण या दरम्यान स्थानकामध्ये थांबा देण्याचीही मागणी निवेदनाद्वारे केली आहे. हे निवेदन सामान्य प्रशासनाकडून आपत्ती व्यवस्थापन विभागाला पाठवले आहे.

ठाणे महापालिकेडून पंधराशे नव्या मालमत्तांचा शोध
कोट्यवधींचा महसूल मिळण्याची अपेक्षा

ठाणे : करोनाचा प्रादुर्भाव रोखण्याच्या कामात व्यस्त असलेल्या ठाणे महापालिकेने जुलै महिन्याच्या मध्यावधीपासून मालमत्ता कर वसुलीवर लक्ष दिले असतानाच, आता गेल्या दोन महिन्यांत शहरातील १५०० नवीन मालमत्ता शोधून त्यांना मालमत्ता कर आकारणीचे काम सुरू केले आहे.

या प्रक्रियेमुळे महापालिकेच्या तिजोरीत कोट्यवधी रुपयांचा महसूल जमा होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. तसेच शहरातील मालमत्ताधारकांकडे असलेली १६० कोटी रुपयांची थकबाकी वसूल करण्यासाठी पालिकेने पावले उचलून त्यापैकी ४४ लाख ७५ कोटींची वसुली केली आहे.

जुलै महिन्याच्या मध्यावधीपासून पालिका प्रशासनाने मालमत्ता कर वसुली करण्यावर भर दिला असून यामुळे नोव्हेंबर महिनाअखेपर्यंत महापालिकेच्या तिजोरीत ३२२ कोटी रुपयांचा महसूल जमा झाला आहे. ठाणे महापालिका क्षेत्रात एकूण पाच लाख दोन हजार करदाते आहेत. त्यापैकी दोन लाख २२ हजार करदात्यांनी कर भरला आहे.

कोट्यवधींचा महसूल मिळण्याची अपेक्षा महापालिका प्रशासनाने गेल्या दोन महिन्यांत शहरातील १५०० नवीन मालमत्ता शोधून त्यांना मालमत्ता कर आकारणीचे काम सुरू केले आहे. त्यामध्ये वाढीव बांधकामे, बांधकामात बदल करणे आणि नवीन बांधकामे यांचा समावेश आहे. या बांधकामांना कराची आकारणी करण्यात आली नव्हती.